<table>
<tr><td>MHST070061832025</td><td>दाखल तारीख :– १५/१२/२०२५.<br>नोंदणी तारीख :– १९/१२/२०२५.<br>निकाल तारीख :– ०९/०६/२०२६.<br>कालावधी :– वर्षे महिने दिवस<br>०० ०५ २४</td></tr>
<tr><td colspan="2">न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र. ३) कराड, जि. सातारा यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी श्री. प्रशांत पी. कुलकर्णी)<br>(घोषित दिनांक – ०९/०६/२०२६)<br>नियमित फौजदारी खटला क्र. ६२१/२०२५ निशाणी क्र. ४१</td></tr>
<tr><td colspan="2">गु. क्र. २९८/२०२५ दिनांक - १०/०७/२०२५<br>उंब्रज पोलीस ठाणे, ता. कराड, जि. सातारा.</td></tr>
<tr><td>तक्रारकर्ता</td><td>महाराष्ट्र शासनातर्फे,<br>वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>उंब्रज पोलीस ठाणे,<br>ता. कराड, जि. सातारा.<br>मुळ तक्रारकर्ता – मनिषा शहाजी कदम,<br>रा. उंब्रज, ता. कराड, जि. सातारा.</td></tr>
<tr><td>अभियोग पक्षातर्फे सहा सरकारी अभियोक्ता :</td><td>श्रीमती. एस.के.अहिवळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</td></tr>
<tr><td>आरोपी -</td><td>१. अमर धुळाप्पा उर्फ दौलाप्पा केरी,<br>वय– २६ वर्ष, धंदा – मजूरी,<br>रा. भुजबळ नगर, माळ वस्ती, मलठणफाटा,<br>शिक्रापुर, ता.शिरुर, जि.पुणे.<br>२. लखन पोपट भोसले (मयत/अबेटेड)</td></tr>
<tr><td>आरोपीतर्फे विधीज्ञ :</td><td>श्री.पी.के.पाटील.</td></tr>
</table>

| भाग - ब | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची दिनांकः** | दि. १०/०७/२०२५ |
| **प्रथम खबर दिनांकः** | १०/०७/२०२५ |
| **दोषारोपपत्राची दिनांकः** | २७/११/२०२५ |
| **दोषारोप ठेवल्याचा दिनांकः** | २०/१२/२०२५ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांकः** | २१/०१/२०२६ |
| **न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांकः** | निरंक |
| **न्यायनिर्णयाचा दिनांकः** | ०९/०६/२०२६ |
| **शिक्षा दिल्याची तारीख, आदेश** | आरोपीची निर्दोष मुक्त करण्यात आली. |

## आरोपींचा तपशील

| आरोपींची श्रेणी | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान आरोपी कारागृहात असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमर धुळाप्पा उर्फ दौलाप्पा केरी | दि.०३/११/ २०२५ | | भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) ३)(५) अन्वये | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. | निरंक | निरंक |

## भाग - क

## अभियोग पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

**अ.**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)अ.सा.क्र.१ |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | मनिषा शहाजी कदम | तक्रारदार |
| अ.सा.क्र. २ | शंकर काशिनाथ घाडगे | घटनास्थळावरील पंच साक्षीदार, |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्र. ३ | चंद्रकांत नथुराम कुंभार | घटनास्थळ पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र. ४ | रोहिणी मारुती साळुंखे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.क्र. ५ | गौरव जयसिंग खवळे | निवेदन पंचनाम्यावरील पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र. ६ | अपुर्वा आकाश अर्जुगडे | पिडीत/साक्षीदार |
| अ.सा.क्र. ७ | सुनिता विजय अर्जुगडे | पिडीत/साक्षीदार |
| अ.सा.क्र. ८ | विजय शंकर अर्जुगडे | साक्षीदार |
| अ.सा.क्र. ९ | सुनिल रामचंद्र वाघमारे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.क्र. १० | शहाजी शंकर कदम | साक्षीदार |
| अ.सा.क्र. ११ | युवराज काशिनाथ पवार | ठाणे अंमलदार |
| अ.सा.क्र. १२ | रमेश पंडित ठाणेकर | तपासी अंमलदार |

## ब. बचाव पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **ब.** | निरंक | निरंक |

## क. न्यायालयामार्फत नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | निशाणी ८ | तक्रार |
| २. | निशाणी १० | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | निशाणी २० | घटनास्थळ पडताळणी पंचनामा |
| ४. | निशाणी ३० | गुन्हा तपासाचा आदेश |
| ५. | निशाणी ३३ | निवेदन पंचनामा |
| ६. | निशाणी ३४ | प्रमाणपत्र |

## बचाव पक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | निरंक | |

## बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयामार्फत निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

## (घोषित दिनांक – ०९/०६/२०२६)

आरोपी विरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०९(४) सह ३(५) अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या अपराधासाठी अभियोग चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. अभियोग पक्षाची हकीकत अशी आहे की, दि. १०/०७/२०२५ रोजी सकाळी ६:१५ वाजण्याच्या सुमारास तक्रारदार सौ.मनिषा कदम व त्यांची मैत्रीण रोहिणी साळूंखे या दोघी उंब्रज ते अंधारवाडी रस्त्यावर फिरायला गेल्या होत्या. सकाळी ६:५५ वाजण्याच्या सुमारास त्या अंधारवाडी गावच्या कमानीजवळील वळणावर चालत आल्या असता काळया रंगाच्या पल्सर मोटार सायकलवरुन तीन अनोळखी इसम तोंडाला मास्क लावून त्यांच्याजवळ आले व मोटार सायकल थांबवून त्यामधील एकाने तक्रारदार यांना खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली व चाकुचा धाक दाखविला. त्यावेळी, दुस–या

इसमाने त्यांच्या गळयातील सोन्याचे गंठण हिसकावून घेतले. त्यावेळी झालेल्या झटापटीमध्ये तक्रारदाराच्या डाव्या हाताच्या अंगठयाला चाकूने मार लागल्याने दुखापत झाली. त्यानंतर ते तिघे मोटार सायकलवरुन उंब्रज बाजूकडे निघून गेले.

३. अभियोगपक्षाची पुढे हकीकत अशी आहे की, तक्रारदार यांना मारहाण करुन जबरदस्तीने त्यांचे सोन्याचे गंठण घेवून जाणा–या इसमांपैकी एकाने पांढ–या रंगाचा फुल शर्ट व निळया रंगाची जीन्स पॅन्ट, दुस–याने डार्क निळया रंगाचा स्वेटशर्ट व निळया रंगाची जीन्स पॅन्ट घातली होती. तक्रारदाराचे दागिणे जबरदस्तीने हिसकावून घेतल्याने तक्रारदार पोलीस ठाणे उंब्रज येथे गेल्या असता त्यांना समजले की, तीन इसमांनी अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व त्यांच्या सासुबाई अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे या दोघी उंब्रज ते शिवडे रस्त्यावर सकाळी फिरायला गेल्या असतांना त्यांना देखील मारहाण करुन त्यांच्या गळयातील दागिणे चाकूचा धाक दाखवून तीन इसमांनी हिसकावून नेले आहे. तक्रारदार यांचे दोन तोळे सोन्याचे मिनी गंठण, अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे यांचे २.५ तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण व अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे यांचे तीन तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण तीन इसमांनी जबरदस्तीने चाकुचा धाक दाखवून हिसकावून नेले असल्याबाबत तक्रारदाराने दि. १०/०७/२०२५ रोजी अज्ञात आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे, उंब्रज येथे तक्रार दिली.

४. सदरच्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उंब्रज येथे गुन्हा नोंद क्र. २९८/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०९(४) सह ३(५) प्रमाणे नोंद करण्यात आला. सदरच्या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक, रमेश ठाणेकर पोलीस ठाणे उंब्रज यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जवाब नोंदवले. तपासाअंती न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

५. दोषारोप प्राप्त झाल्यानंतर आरोपी विरुध्द निशाणी ४ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. सदरील दोषारोप आरोपीला मराठी भाषेत समजावून सांगितले. आरोपीने सदरील दोषारोप नाकारुन प्रकरण चालविण्यास सांगितले. आरोपीचे सदरचे बयान निशाणी ५ प्रमाणे नोंदविण्यात आले.

६. आरोपीविरुध्द असलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा आल्याने आरोपीचे

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ चे बयान निशाणी ३५ नुसार नोंदविण्यात आले. आरोपीने त्याच्या विरोधात खोटी केस केल्याचे कथन केले आहे. परंतू, आरोपीतर्फे कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही.

७. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.एस.के.अहिवळे व आरोपी क्र. १ तर्फे वकील श्री.पी.के.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

८. अभियोग पक्षाच्या पुराव्याचा विचार करता माझ्या मते खालील प्रमाणे मुद्दे उपस्थीत होतात. सदरील प्रत्येक मुद्दयाचा निष्कर्ष मी कारणासहीत अनुमान काढुन निष्कर्ष नोंदवलेला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि.१०/०७/२०२५ रोजी सकाळी ६:५५ वाजण्याच्या सुमारास मौजे उंब्रज ता.कराड गावच्या हद्दीत अंधारवाडी रोडवर यातील आरोपी क्र. १ व त्याचा साथीदार यांनी आपसात संगणमत करुन मोटार सायकलवरुन येवून तक्रारदार यांचे तसेच शिवडे गावचे हद्दीत सव्र्हीस रोडवर साक्षीदार अपुर्वा अर्जुगडे व सुनिता अर्जुगडे यांना चाकुचा धाक दाखवून त्यांच्या गळयातील सोन्याचे दागिने तक्रारदार व साक्षीदार यांच्या संमतीशिवाय जबरी चोरी केली आणि त्या परिणामी भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०९(४) सह ३(५) अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करिता :-**

९. अ.सा.क्र. १ तक्रारदार सौ.मनिषा कदम यांच्या पुराव्यानुसार दि.

१०/०७/२०२५ रोजी सकाळी त्या व त्यांची मैत्रीण अ.सा.क्र. ४ रोहिणी साळूंखे यांच्यासोबत फिरायला गेल्या असता अंधारवाडी वळणाजवळ तीन अज्ञात इसमांनी मोटार सायकलवर येवून त्यांना मारहाण करुन चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळयातील मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावून घेतले त्यावेळी त्यांना डाव्या हाताला मार लागून दुखापत झाली. त्यानंतर ते तिघे उंब्रज बाजूकडे मोटार सायकलवर निघून गेले.

१०. तक्रारदार यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांना मारहाण करुन जबरदस्तीने दागिणे हिसकावून घेणा–यापैकी एकाने पांढरा शर्ट व निळी जीन्स पॅन्ट, दुस–याने निळा स्वेटशर्ट व निळी जीन्स पॅन्ट घातली होती. त्या तिघांनी तक्रारदाराला शिवीगाळ करुन सुरा भोकसून मारुन टाकण्याची धमकी दिली होती. घटनेनंतर तक्रारदार पोलीस ठाणे उंब्रज येथे गेला असता अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व त्यांच्या सासुबाई अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे यांचे देखील मंगळसुत्र जबरदस्तीने लुटल्याचे त्यांना समजले. त्यानंतर, तक्रारदाराने पोलीस ठाणे उंब्रज येथे तक्रार दिली.

११. तक्रारदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तपासादरम्यान तक्रारदाराला पोलीसांनी बोलावून घेवून एक आरोपी मयत झाल्याचे, दुसरा पोलीसांच्या ताब्यात असल्याचे व तिसरा फरार झाल्याचे सांगितले. मयत आरोपीकडे चोरीचा ऐवज असल्याचे सांगितले. घटनेवेळी आरोपींनी तोंडाला रुमाल बांधला होता. अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे यांचे मंगळसुत्र चोरी करतांनाच्या सी.सी.टी.व्ही फुटेजमधील आरोपींनी तक्रारदाराला पोलीस पंचनाम्यासाठी घेवून गेले. तक्रारदाराने तक्रार (निशाणी ८) व एफ.आय.आर (निशाणी ९) सिध्द् केला.

१२. अ.सा.क्र. २ शंकर घाडगे व अ.सा.क्र. ३ चंद्रकांत कुंभार हे घटनास्थळाचे पंच साक्षीदार आहेत. त्यांच्या पुराव्यानुसार दि. १०/०७/२०२५ रोजी ते, तक्रारदार, दुसरे पंच व पोलीस अधिकार व अर्जुगडे यांच्या समक्ष घटनास्थळी गेले होते. त्याठिकाणी पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा (निशाणी १०) केला.

१३. अ.सा.क्र. ४ रोहिणी साळूंखे या घटनेच्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. त्यांच्या पुराव्यानुसार घटनेच्या दिवशी त्या तक्रारदारासोबत सकाळी फिरायला गेल्या असता तीन अज्ञात इसमांनी मोटार सायकलवर येवून तक्रारदाराला मारहाण करुन खाली

पाडले व तिच्या गळयाला सुरा लावून तिचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावून घेतले. त्यावेळी एका आरोपीने या साक्षीदाराला पकडून ठेवले होते. त्या झालेल्या झटापटीमध्ये तक्रारदाराच्या अंगठयाला व गळयाला सुरा लागून दुखापत झाली होती. या साक्षीदाराला देखील गुडघ्याला दुखापत झाली होती. घटनेनंतर तक्रारदाराने तक्रार दिली होती. तपासकामात सी.सी.टी.व्ही फुटेजमध्ये आरोपी दिसत होते. न्यायालयात व्ही.सी द्वारे हजर असलेल्या आरोपीनेच गुन्हा केल्याबाबत या साक्षीदाराने पुरावा दिलेला आहे.

१४. अ.सा.क्र. ५ गौरव खवळे हे घटनास्थळ पडताळणी पंचनाम्यावरील साक्षीदार आहेत. त्यांच्या पुराव्यानुसार दि. ०४/११/२०२५ रोजी दुसरे पंच शिंदे यांच्या सह ते पोलीस ठाणे उंब्रज येथे हजर असतांना आरोपी अमर केरी याने गुन्हा केला असल्याचे मान्य करुन घटनास्थळ दाखवितो, माझ्यासोबत चला असे निवेदन दिल्यावरुन ते आरोपी दाखविल्याप्रमाणे घटनास्थळी गेले. सुरवातील आरोपी त्यांना अंधारवाडी येथे घेवून गेला व त्याठिकाणातील एका महिलेच्या गळयातील दागिणे हिसकावून घेतल्याबाबत आरोपीने सांगितले. त्यानंतर आरोपी त्यांना शिवडे गावातील महागणपती मंदिराजवळ असलेल्या रस्त्याजवळ घेवून गेला, त्याठिकाणी आरोपीने दोन महिलांच्या गळयातील दागिणे हिसकावून घेतले असल्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे पोलीसांनी घटनास्थळ पडताळणी पंचनामा तयार केला. या साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा (निशाणी२०) न्यायालयात सिध्द् केला.

१५. अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे यांच्या पुराव्यानुसार घटनेच्यादिवशी सकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास त्या सासुबाई सुनिता अर्जुगडे यांच्यासह फिरायला गेल्या असता पल्सर सारख्या मोटार सायकलवर येवून तीन इसमांनी त्यांना खाली पाडून चाकुचा धाक दाखवून त्यांच्या गळयातील अडीच तोळे सोन्याचे व सासूबाईचे तीन तोळे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावून नेले. त्यानंतर पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला. दि. ०५/११/२०२५ रोजी पोलीसांनी त्यांना पोलीस ठाणे उंब्रज येथे बोलविले त्यावेळी सदरील गुन्हा आरोपी अमर केरी व लखन भोसले यांनी केला असल्याचे त्यांना समजले. आरोपी लखन भोसले मयत झाला होता. ताब्यातील आरोपी अमर केरी याने मुद्देमाल पोलीसांना दिला नाही व मयत आरोपी लखन भोसले यांच्याकडे दागिणे असल्याचे सांगितले. या साक्षीदाराने आरोपीला न्यायालयात ओळखले.

१६. अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे यांच्या पुराव्यानुसार दि. १०/०७/२०२५ रोजी सकाळी त्या व त्यांच्या सुनबाई अ.सा.क्र. ६ अपुर्वा अशा दोघी फिरायला गेल्या असता तीन अज्ञात इसमांनी त्यांना मारहाण करुन चाकुचा धाक दाखवून त्यांच्या गळयातील सोन्याचे दागिणे हिसकावून घेतले. घटनेनंतर तपासादरम्यान आरोपी लखन भोसले मयत झाल्याचे व आरोपी अमर केरी याने गुन्हा केल्याचे मान्य करुन सोन्याचे दागिने मयत आरोपीकडे असल्याचे सांगितले. या साक्षीदाराने आरोपीला न्यायालयात ओळखले.

१७. अ.सा.क्र. ८ विजय अर्जुगडे हे अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे यांचे पती व अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे यांचे सासरे आहेत. त्यांच्या पुराव्यानुसार घटना त्यांना अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे व अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे यांनी सांगितली. अ.सा.क्र. १० शहाजी कदम हे तक्रारदार यांचे पती आहेत. त्यांच्या पुराव्यानुसार तक्ररदाराने त्यांना घटना सांगितली.

१८. अ.सा.क्र. ९ सुनिल वाघमारे हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. त्यांच्या पुराव्यानुसार दि. १०/०७/२०२५ रोजी सकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास ते फिरायला मसुर रस्त्यावर गेले असता तीन इसम दोन महिलांसोबत झटापटी करुन त्यांना मारहाण करत असल्याचे त्यांना दिसले. घटनास्थळी ते जाईपर्यत ते तिघे निघून गेले होते. त्या दोन महिलांनी त्यांच्या गळयातील दागिणे जबरदस्तीने हिसकावून नेल्याचे त्यांना सांगितले. या साक्षीदाराने आरोपीला न्यायालयात ओळखले.

१९. अ.सा.क्र. ११ युवराज पवार यांनी गुन्हा नोंद केला व अ.सा.क्र. १२ रमेश ठाणेकर यांनी या गुन्हयाचा तपास केला आहे. त्यांनी निवेदन पंचनामा (निशाणी २० आणि ३३) फोटो (आर्टीकल अ१ ते अ४) व प्रमाणपत्र (निशाणी ३४) न्यायालयात सिध्द् केले.

२०. उपरोक्त पुराव्यानुसार श्रीमती.एस.के.अहिवळे सहा.सरकारी अभियोक्त्या यांनी युक्तीवाद केला की, आरोपींनी गुन्हा केल्याचे तक्रारदार व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी दिलेला पुरावा अबाधित राहिलेला आहे. सदर पुराव्याला स्वतंत्र साक्षीदारांच्या पुराव्याची पुष्ठी मिळालेली आहे. आरोपीला साक्षीदारांनी न्यायालयात ओळखले आहे. आरोपीने गुन्हा

केल्याचे अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून सिध्द् केले आहे. त्यामुळे, आरोपीला दोषी ठरवून जास्तीजास्त शिक्षा करावी.

२१. उलटपक्षी, श्री.पी.के.पाटील आरोपीतर्फे युक्तीवाद केला की, आरोपीचा सदरील घटनेतील गुन्हयात कोणताही संबंध नाही. लखन भोसले याच्या मृत्यू प्रकरणात पोलीसांवर गुन्हा नोंद झालेला आहे. त्या प्रकरणात आरोपी अमर केरी हा साक्षीदार असल्याने त्याला या खोटया गुन्हयात गुंतविलेले आहे. आरोपीकडून कोणताही मुद्देमाल हस्तगत झालेला नाही. गुन्हयातील वाहन देखील जप्त नाही. आरोपीची ओळखपरेड झालेली नव्हती. तिस–या आरोपीचे नांव देखील निष्पण्ण झालेले नाही. घटनेच्या वेळी घटनास्थळी आरोपी हजर नव्हता. आरोपीने गुन्हा केलेला नसल्याने त्याला निर्दोष मुक्त करण्यात यावे.

२२. अभिलेखाचे अवलोकन केले असता अ.सा.क्र. २ शंकर घाडगे व अ.सा.क्र. ३ चंद्रकांत कुंभार हे घटनास्थळाचे पंच साक्षीदार आहेत. त्यांनी घटनास्थळ पंचनामा (निशाणी १०) सिध्द् केलेला आहे. या दोन्ही साक्षीदारांचा पुरावा अ.सा.क्र. १ तक्रारदार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ४ रोहिणी साळुंखे, अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ९ सुनिल वाघमारे यांच्या पुराव्याला घटनास्थळाबाबत सुसंगत आहे. त्यांच्या उलटतपासात त्यांनी दिलेला पुरावा नाकारण्यासाठी काहीही आलेले नाही. त्यामुळे, तक्रारदार व पिडित यांनी सांगितल्याप्रमाणे घटनेच्या नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी घटना घडली असल्याचे सिध्द् होते. आता सदरील घटना आरोपीने केली असल्याबाबत सिध्द् होणे गरजेचे आहे.

२३. अ.सा.क्र. ८ विजय अर्जुगडे व अ.सा.क्र. १० शहाजी कदम यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. ते घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यांचा पुरावा ऐकीव स्वरुपाचा असल्याने आरोपीविरुध्द निश्चीत केलेले दोषारोप सिध्द् करण्यासाठी या साक्षीदारांचा पुरावा उपयुक्त नाही.

२४. अ.सा.क्र. १ तक्रारदार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ४ रोहिणी साळुंखे, अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ९ सुनिल वाघमारे यांच्या पुराव्यानुसार पल्सर मोटार सायकलवरुन आलेल्या तीन इसमांनी तक्रारदार व पिडीत यांना मारहाण करुन चाकुचा धाक दाखवून त्यांचे दागिणे

लुटले. परंतू, या प्रकरणात सदरील पल्सर मोटार सायकल जप्त नाही. या साक्षीदारांनी घटनेतील मोटार सायकल ही युनिकॉर्न असल्याबाबत देखील पुरावा दिलेला आहे. सदरील मोटार सायकल देखील या प्रकरणात जप्त नाही.

२५. तपासी अंमलदार अ.सा.क्र. १२ ठाणेकर यांच्या पुराव्यानुसार सातारा पोलीस ठाणे येथील गु.र.नं. ७२१/२०२५ या गुन्हयाच्या तपासकामी सदर वाहन जप्त असल्याने त्यांनी या प्रकरणातील वाहन जप्त केलेले नाही असा पुरावा दिलेला आहे. परंतू, त्याबाबत अभिलेखामध्ये काहीही नाही. आरोपी कोणत्या मोटार सायकलवरुन आलेले होते त्याचा क्रमांक देखील अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, गुन्हयातील वाहन कोणाच्या मालकीचे होते याबाबत कोणताही पुरावा आलेला नाही.

२६. अ.सा.क्र. १ तक्रारदार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ४ रोहिणी साळुंखे, अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ९ सुनिल वाघमारे यांच्या पुराव्यानुसार मोटार सायकलवरुन आलेल्या तीन इसमांनी तक्रारदार व पिडीत यांना चाकुचा धाक दाखवून मारहाण करुन दागिणे लुटले. परंतू, तपासकामी चाकु जप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, गुन्हयातील हत्यार जप्त नाही.

२७. अ.सा.क्र. १ तक्रारदार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ४ रोहिणी साळुंखे, अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ९ सुनिल वाघमारे यांच्या पुराव्यानुसार मोटार सायकलवरुन आलेल्या तीन इसमांनी तक्रारदार व पिडीत यांना चाकुचा धाक दाखवून मारहाण करुन दागिणे लुटले आणि तपासकामात सी.सी.टी.व्ही फुटेजवरुन आरोपी क्र. १ हा त्यापैकी एक असल्याचे निष्पण्ण झाले. परंतू, या प्रकरणात तपासी अंमलदार अ.सा.क्र. १२ ठाणेकर यांनी सी.सी.टी.व्ही फुटेज हस्तगत केले असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, घटना आरोपीने केली याबाबत संशय निर्माण होतो.

२८. अ.सा.क्र. १ तक्रारदार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ४ रोहिणी साळुंखे, अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अ.सा.क्र. ९ सुनिल वाघमारे यांच्या पुराव्यानुसार मोटार सायकलवरुन आलेल्या तीन

इसमांनी तक्रारदार व पिडीत यांना चाकुचा धाक दाखवून मारहाण करुन दागिणे लुटले आणि सी.सी.टी.व्ही. फुटेज द्वारे आरोपी निष्पण्ण केले आणि साक्षीदाराने सदर आरोपीला त्याच्या शरिरयष्टी व बॉडीलॅग्वेजवरुन ओळखले.

२९. परंतू, या सर्व साक्षीदारांनी उलटतपासात ही बाब मान्य केली आहे की, तपासादरम्यान आरोपीसोबत त्यांची ओळख परेड घेण्यात आली नव्हती. सदर आरोपीच्या शरिरयष्टी व बॉडीलॅग्वेज बाबत पुरावा आलेला नाही. तक्रारदार, पिडीत व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे पुर्वीपासून आरोपीला ओळखत नसल्याने प्रकरणात ओळख परेड गरजेची असतांना सदरील ओळख परेड झालेली नाही. सबब, सी.सी.टी.व्ही फुटेज मध्ये दिसणारे आरोपी व या प्रकरणातील अटक आरोपी हे एकच असल्याबाबत या साक्षीदारांचा पुरावा पुरेसा नाही.

३०. अ.सा.क्र. ६ गौरव खवळे व तपासी अंमलदार अ.सा.क्र. १२ ठाणेकर यांच्या पुराव्यानुसार आरोपीने गुन्हा केल्याचे मान्य करुन दोन पंचासमक्ष निवेदन देवून घटनास्थळ दाखविले. निवेदन पंचनामा (निशाणी ३३) चे अवलोनक केले असता आरोपीने गुन्हा केल्याचे मान्य करुन घटनास्थळ दाखविले असल्याचे दिसून येते. परंतू, सदर निवेदनाप्रमाणे तपासकामी कोणतीही चीज वस्तु अथवा हत्यार हस्तगत झालेले नाही. त्यामुळे, केवळ निवेदन पंचनामा (निशाणी ३३) आरोपीविरुध्द निश्चीत केलेले दोषारोप सिध्द् करण्याकरिता उपयुक्त नाही.

३१. आरोपीने असा बचाव घेतला आहे की, लखन भोसले याच्या मृत्यूप्रकरण पोलीसांवर गुन्हा नोंद झालेला आहे. त्या प्रकरणात आरोपी हा साक्षीदार असल्याने त्याला या प्रकरणात चुकीचे गोवले आहे. तपासी अंमलदार अ.सा.क्र. १२ ठाणेकर यांनी ही बाब मान्य केली आहे की, पोलीसांसोबत झालेल्या झटापटीमध्ये लखन भोसले हा मयत झाला असून त्यावेळी आरोपी हजर होता. त्यांनी ही देखील बाब मान्य केली आहे की, सदर घटनेवेळी पोलीसांवर हमला केला म्हणून आरोपीविरोधात पोलीस ठाणे शिक्रापूर, जि.पुणे येथे गुन्हा नोंद झालेला असून त्याला तपासादरम्यान येरवडा जेल मधून ताब्यात घेतले होते.

३२. अभिलेखानुसार तीन अज्ञात इसमांनी तक्रारदार व पिडीत यांना मारहाण करुन त्यांचे दागिणे लुटले. या प्रकरणातील सर्व साक्षीदारांच्या पुराव्यानुसार एक आरोपी मयत झाला असून दुस–या आरोपीला पोलीसांनी अटक केली. परंतू, प्रकरणातील तिस–या आरोपीबाबत कोणताही पुरावा आलेला नाही. तपासी अंमलदार अ.सा.क्र. १२ ठाणेकर यांनी देखील तिस–या आरोपीचे नाव निष्पण्ण झालेबाबत पुरावा दिलेला नाही. त्यामुळे, अभिलेखावरील पुराव्याचा, तपासी अंमलदार अ.सा.क्र. १२ ठाणेकर यांनी दिलेल्या कबुलीचा आणि आरोपीच्या बचावाचा एकत्रीत विचार करता आरोपीतर्फे घेण्यात आलेला बचाव संयुक्तीक वाटतो.

३३. आरोपीविरुध्द निश्चीत केलेले दोषारोप पाहता ही बाब सिध्द होणे गरजेचे होते की, घटनेच्या नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी मौजे उंब्रज ता.कराड गावच्या हद्दीत अंधारवाडी रोडवर यातील आरोपी क्र. १ व त्याचा साथीदार यांनी आपसात संगणमत करुन मोटार सायकलवरुन येवून तक्रारदार यांचे तसेच शिवडे गावचे हद्दीत सव्र्हीस रोडवर साक्षीदार अ.सा.क्र. ६ अपुर्वा अर्जुगडे व अ.सा.क्र. ७ सुनिता अर्जुगडे यांना चाकुचा धाक दाखवून त्यांच्या गळयातील सोन्याचे दागिने तक्रारदार व साक्षीदार यांच्या संमतीशिवाय जबरी चोरी केली. परंतू, या प्रकरणात मुद्देमाल, गुन्हयातील हत्यार व घटनेवेळेची मोटार सायकल जप्त नाही. आरोपीची ओळखपरेड झालेली नसल्याने घटनेवेळी आरोपी हजर असल्याबाबत संशय निर्माण होतो. निवेदन पंचनाम्यानुसार कोणतीही जप्त झालेली नाही. आरोपीने घेतलेला बचाव संयुक्तीक आहे. गुन्हयात तीन आरोपी असतांना तिस–या आरोपीचे नांव देखील निष्पण्ण झालेले नाही. या सर्व बाबींचा विचार करता आरोपी विरुध्द निश्चित केलेले दोषारोप सिध्द् करण्यातकरिता उपयुक्त असणारे घटक सिध्द् करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे, आरोपीला संशयाचा फायदा देणे गरजेचे आहे. सबब, मुद्दा क्र. १ बाबत मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता–</u>**

३४. वर विवेचन केल्याप्रमाणे आरोपीविरुध्द दोष सिध्द होईल इतपत कोणताही पुरावा अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर देण्यात आलेला नाही. त्यामुळे, सबळ पुराव्याअभावी आरोपीची निर्दोष मुक्तता करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

# आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी अमर धुळाप्पा उर्फ दौलाप्पा केरी यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(४) सह कलम ३(५) या अपराधातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेकरीता मा. वरिष्ठ न्यायालयांनी निर्देश दिल्यानंतर हजर राहण्याकरीता वैयक्तीक व जामीनदाराचे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे बंधपत्र द्यावे. |
| ३. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात संगणकावर थेट टंकलिखीत करुन जाहीर केला. |

PRASHANT PRAKASHRAO KULKARNI

Digitally signed by PRASHANT PRAKASHRAO KULKARNI
Date: 2026.06.09 16:15:02 +0530

**(प्रशांत पी. कुलकर्णी)**

दिनांक – ०९/०६/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,क स्तर,
(न्यायालय क्र.३), कराड.